Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)
Vol - VI Issue - V MAY 2019 Peer Review e-Journal Impact Factor 5.707 ISSN 2349-638x

# नांदेड शहरातील माध्यमिक स्तरावरील विध्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीवर कौटुंबिक परिस्थितीचा होणारा परिणाम अभ्यासणे

मार्गदर्शक
ए.पि. गिणगिणे
सहाय्यक प्राध्यापक स्वा.रा.ती.म.वि.नांदेड

संशोधक विद्यार्थी
एस.आर.लखमावाड
एम फिल शिक्षणशास्त्र स्वा.रा.ती.म.वि.नांदेड

**प्रस्तावना :-**

व्यक्ती व समाज यांच्यात अंतरक्रिया घडवून आणणारी व व्यक्तीच्या सामाजीकरणाला प्रारंभ करणारी पहिली व महत्वाची संस्था म्हणजे कुटुंब कुटुंब हा एक प्राथमिक समूह आहे कुटुंबसंस्था निर्माण झाल्यापासूनच खर्या अर्थाने माणसाच्या प्रगतीला व त्यांच्या सामाजिक विकासाला गती मिळाली.

एक किंवा अधिक माणसे एक किंवा अधिक स्त्रिया व यांची औरस संतती वा दत्तक मुले जि निदान बालवयात आईवडिलांजवळ राहतात. जेंव्हा एकाच घरात राहतात तेंव्हा त्या सामाजिक समूहाला कुटुंब असे म्हणतात

मुल कुटुंबातच जन्माला येते कुटुंबातच त्यांचे संगोपन होते. तसेच कुटुंबातून सुक्षिततेची भावना व प्रेम, वात्सल्य, माया या मुलभूत मानसिक गरजा पूर्ण होतात

प्रत्येक कुटुंबातूनच या मानसिक गरजा पूर्ण होतील असे म्हणता येत नाही.

ज्या आईवडिलांकडून मुलांना पुरेसे प्रेम व जिव्हाळा मिळतो त्यांचा मानसिक विकास चांगला होतो उलट या मायेच्या अभावी मुले एकलकोंडी उसंडी व निष्ठुर व हृदयशून्य होण्याची शक्यता अधिक सावज आईच्या जाचामुळे, अतीकडक शिस्तीमुळे वा पती पत्नीतील सतत भांडणामुळे मुलांच्या मानसिक विकासावर विपरीत परिणाम होऊन अनेक प्रकारचे गंड त्यांच्या मनात निर्माण होतात.

अन्न,वस्त्र,निवारा या मनुष्याच्या मुलभूत गरजा त्या भागविण्यासाठी कुटुंबाला धडपड करावी लागते. कुटुंब प्रमुख आयोजन करतो व कुटुंबियांच्या उदरभरनाची व इतर जीवनावश्यक गरजांची पूर्तता करतो त्यातच शिक्षण देणे हे कुटुंबाचे महत्वाचे कार्य आहे. शिक्षणासाठी आनाश्यक साधन सुविधा प्रत्येक स्तरातील विद्यार्थ्यास मिळतात का ? तसेच कुटुंबातील विध्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीवर कशाप्रकारे परिणाम होतो हे प्रस्तुत संशोधनातून अभ्यासावयाचे आहे

"नांदेड शहरातील माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीवर कौटुंबिक परिस्थितीचा होणारा परिणाम अभ्यासणे" .

**संशोधन उदिष्टे :-**

1. माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यावर कुटुंबाच्या आर्थिक परिस्थितीचा होणारा परिणाम अभ्यासणे.
2. माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीवर कौटुंबिक वातावारणाचा होणारा परिणाम अभ्यासणे.
3. कौटुंबिक परिस्थितीचा विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीत असलेली आवश्यकता लक्षात आणून देणे.

**संशोधन परिकल्पना :-**

1. माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीवर कौटुंबिक आर्थिक परिस्थितीचा परिणाम होतो.
2. कौटुंबिक वातावरण चांगले असेल तर विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगती चांगली असते.
3. कौटुंबिक वातावरणाचा विद्यार्थ्यांच्या अध्यापनावर कोणताच परिणाम होत नाही.
4. कुटुंबातून विद्यार्थ्यांच्या अभ्यासाकडे दुर्लक्ष होते
5. विद्यार्थ्यांना शिक्षण घेताना आर्थिक अडचणी य येतात

**संशोधन पद्धती :-**

संशोधीकेने सदर संशोधनासाठी समस्येचे स्वरूप व्याप्ती, महत्व, गरज, मर्यादा, उदिष्टे, परिकल्पना यांना अनुसरून सर्वेक्षण पद्धतीची निवड केली.

**संशोधन जनसंख्या:-**

प्रस्तुत संशोधनात नांदेड शहरातील10 माध्यमिक शाळा हि संशोधनाची जनसंख्या आहे विद्यार्थी आणि या क्षेत्रातील इ. 8 वी च्या वर्गातील विद्यार्थी जनसंख्या आहे.

**संशोधन साधने :-**

या संशोधन प्रश्नावली व पडताळासुची या साधनाचा वापर केला त्यात

1. विद्यार्थी प्रश्नावली
2. पालक प्रश्नावली
3. शिक्षक पडताळासूची

इत्यादी साधनांचा वापर केला.

**माहिती विश्लेषण :-**

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधीकेने नांदेड शहरातील एकूण चार विद्यालयाची निवड करण्यात आली यासाठी विद्यार्थी प्रश्नावली, पालक प्रश्नावली आणि शिक्षक पडताळासूचीचा वापर करण्यात आला. या साधनाचा वापर करून माहिती संकलित करण्यात आली आणि या संकलित माहितीच्या आधारे विश्लेषण करण्यात आले.

**वडिल कोणता व्यवसाय करतात ?**

| अ.क्र. | प्रतिसादकाचा प्रतिसाद | विद्यार्थी संख्या | शेकडेवारी |
|---|---|---|---|
| 01 | शेती | 04 | 10.25 % |
| 02 | नौकरी | 21 | 53.84 % |
| 03 | उद्योग | 06 | 15.38 % |
| 04 | मजुरी | 08 | 20.51 % |
| एकूण | | 39 | 100% |

**आई काय करते?**

| अ.क्र. | प्रतिसादकाचा प्रतिसाद | विद्यार्थी संख्या | शेकडेवारी |
|---|---|---|---|
| 01 | नौकरी | 07 | 17.94 % |
| 02 | गृहिणी | 31 | 79.48 % |
| 03 | व्यवसाय | 01 | 2.56 % |
| एकूण | | 39 | 100 % |

**घरात किती भावंडे आहेत**

| अ.क्र. | प्रतिसादकाचा प्रतिसाद | विद्यार्थी संख्या | शेकडेवारी |
|---|---|---|---|
| 01 | एक | 06 | 15.32 % |
| 02 | दोन | 15 | 38.46 % |
| 03 | तीन | 09 | 23.07 % |
| 04 | 4 व 4 पेक्षा जास्त | 09 | 23.07 % |
| एकूण | | 39 | 100% |

**निष्कर्ष :-**

1. बहुतांश विद्यार्थ्यांचे वडिल कमावते आहेत आणि नौकरी करणारे आहेत.
2. बहुतांश विद्यार्थ्यांना वेळेवर शैक्षणिक साहित्य मिळते.
3. फिस भरण्यासाठी घरातून वेळेवर पैसे दिले जातात.
4. बहुतांश विद्यार्थी ट्युशनला जात नाहीत
5. बहुतांश विद्यार्थ्यांचा अभ्यास घरी घेतला जातो.
6. बहुतांश विद्यार्थ्यांचे कुटुंब विभक्त प्रकारचे आहेत
7. मुलांना कधी – कधी स्वत:चे निर्णय घेऊ दिले जातात.

**संदर्भसूची:-**

1. प्र.न.(1992) "आदर्श मराठी शब्दकोश" विदर्भ मराठा बुक कंपनी कोथरूड पुणे
2. व.दा. गोखले, "मराठी भाषा लघुकोश"
3. संपादक दह. (1992) "अभिनव मराठी – मराठी शब्दकोश"
4. पंडित ब.बि. (2007) "शिक्षणातील संशोधन", नूतन प्रकाशन, पुणे
5. भिंताडे वि.रा. (जुलै 1999) "शैक्षणिक संशोधन पद्धती, "नूतन प्रकाशन" पुणे.
6. डॉ.आगलावे प्रदीप (जानेवारी 2000) "संशोधन पद्धतीशाळा व तंत्रे", नूतन प्रकाशन, पुणे